# प्रेसनोट

दि. ०८/०८/२०२३

**पुणे महानगरपालिका वैद्यकिय शिक्षण ट्रस्ट अंतर्गत भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकिय महाविद्यालय, पुणे येथील अधिष्ठाता (डिन) यांचेवर लाच मागणी व लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | समर्थ पोलीस स्टेशन, पुणे शहर |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ४९ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आशिष श्रीनाथ बनगिनवार, वय ५४ वर्ष, अधिष्ठाता (वर्ग-१), भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकिय महाविद्यालय, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १६,००,०००/- रुपये (सोळा लाख रुपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | पहिला हप्ता १०,००,०००/- रुपये (दहा लाख रुपये) |
| पडताळणी दिनांक | ०७/०८/२०२३ व दिनांक ०८/०८/२०२३ |
| सापळा दिनांक | ०८/०८/२०२३ |

ठिकाण :- भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकिय महाविद्यालय, पुणे येथील अधिष्ठाता यांचे कार्यालयात.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचा मुलगा NEET परिक्षा-२०२३ मध्ये उत्तीर्ण झाला होता. त्याची एम.बी.बी.एस. च्या प्रवेशासाठी महाराष्ट्र राज्याच्या पहिला कॅप राऊंडमध्ये पुणे महानगरपालिका वैद्यकिय शिक्षण ट्रस्ट अंतर्गत भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकिय महाविद्यालय, पुणे येथे इन्स्टिट्युशनल कोटा मधून निवड झाली होती. या निवड यादीचे आधारे तक्रारदार हे लोकसेवक आशिष बनगिनवार, डीन यांना मुलाचे एम.बी.बी.एस. च्या महाविद्यालयात प्रवेश प्रक्रीयेसाठी भेटले असता, त्यांनी दरवर्षाची शासनमान्य विहीत फी २२,५०,०००/- (बाविस लाख पन्नास हजार) रुपये व्यतिरिक्त प्रवेशासाठी १६,००,०००/- (सोळा लाख रुपये) लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता, लोकसेवक आशिष बनगिनवार, डीन यांनी तक्रारदार यांच्या मुलाचे एम.बी.बी.एस. च्या प्रवेशासाठी तडजोडीअंती १६ लाख रुपये लाच रक्कम म्हणून मागणी करुन, त्यापैकी पहिला हप्ता १०,००,०००/- रुपये (१० लाख रुपये) त्यांचे कार्यालयात स्विकारल्यावर त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असून, समर्थ पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस उपअधीक्षक श्री. सुदाम पाचोरकर तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन अ‍ॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.